शासन परिपत्रक दिनांक २.६.२०२५ मधील तरतूदींच्या अंमलबजावणी बाबत........

**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वन विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण २०२६/प्र.क्र. ई.१५५०४७३ /पुनर्वसन-१**

पहिला मजला, मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय,मुंबई-४०००३२.

**दिनांक :- ७ एप्रिल, २०२६**

शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण २०२६/प्र.क्र. ई.१५५०४७३ /पुनर्वसन-१

**संदर्भ:** १) शासन परिपत्रक क्र. आरपीए/२०२४/प्र.क्र.७५/२-१, दिनांक २ जून २०२५

२) शासन पत्र क्र. आरपीए-२०२५/ई-ऑफिस १००९३५२/र-१, दिनांक ४ मार्च २०२५

**प्रस्तावना :-** हिंदु वारसा हक्क (सुधारणा) अधिनियम, २००५ मधील कलम ६, पुनर्वसन अधिनियमातील कलम २(२) (अ) व त्याखालील परंतुक यांचा एकत्रितपणे विधीशास्त्रीय अर्थ लावून, "बंदी दिनांक" ऐवजी "संपादीत जमिनीच्या निवाड्याचा दिनांक" हा निकष ग्राह्य धरणे अधिक संयुक्तिक असल्याने प्रकल्पाच्या बंदी दिनांकापूर्वी मयत झालेल्या भूधारकांच्या वारसांना पुनर्वसनाचे लाभ देण्याबाबत एकरुपता व सुस्पष्टता आणण्याच्या उद्देशाने शासन परीपत्रक दिनांक २ जून २०२५ निर्गमित करण्यात आले आहे. सदर परिपत्रकातील तरतुदींच्या आधारे प्रकल्पग्रस्त वारसांना स्वतंत्र घटक/युनिट म्हणून पुनर्वसनाच्या लाभ देय ठरावेत, हा शासनाचा स्पष्ट उद्देश आहे.

तथापि, काही जिल्हा पुनर्वसन अधिकारी दिनांक ४.३.२०२५ च्या पत्राचा आधार घेऊन वारसांना स्वतंत्र प्रकल्पग्रस्त खातेदार म्हणून पुनर्वसन लाभ देण्यास नकार देत आहेत. सदर बाब शासन परिपत्रक दिनांक २.६.२०२५ अन्वये विहित केलेल्या धोरणाशी पूर्णतः विसंगत असल्याने, मयत भूधारकांच्या वारसांना लाभ देण्याबाबत खालीलप्रमाणे स्पष्टिकरणात्मक सूचना देण्यात येत आहेत:-

**शासन परिपत्रक :-**

१. "प्रकल्पाच्या बंदी दिनांकापूर्वी मयत झालेल्या भूधारकांच्या वारसांना पुनर्वसनाचे लाभ देण्याबाबत" निर्गमित शासन परिपत्रक दिनांक २ जून २०२५ मधील तरतुदी या बंधनकारक असून सर्व प्रकरणांत त्यानुसारच कार्यवाही करण्यात यावी.

२. दिनांक ४.३.२०२५ रोजीचे पत्र हे शासन परिपत्रक दिनांक २.६.२०२५ पूर्वी निर्गमित झाल्याने, सदर पत्रातील जे निर्देश हे शासन परिपत्रक दिनांक २.६.२०२५ मधील तरतुदींशी विसंगत आहेत, असे निर्देश अधिक्रमित व अपरिणामकारक ठरतील.

३. "एकत्र कुटुंब कर्ता" या संज्ञेचा अर्थ लावताना, शासन परिपत्रक दिनांक २.६.२०२५ मधील मार्गदर्शक तत्त्वांनुसार, मूळ भूधारकाच्या प्रत्येक मुलगा/मुलगी (आणि त्यांच्या पुढील पिढीतील वारस) यांना अनुक्रमे स्वतंत्र घटक किंवा एक युनिट म्हणून प्रकल्पबाधित व्यक्ती मानण्यात यावे.

४. पूर्वीच्या शासन पत्र/परिपत्रकांतील "संयुक्तपणे एक युनिट" ही संकल्पना केवळ भूसंपादन निवाडा रक्कम वाटपाच्या संदर्भापुरती मर्यादित आहे; ती पुनर्वसन अधिनियमांतर्गत प्रकल्पबाधित व्यक्तीच्या दर्जाचे निर्धारण करण्यासाठी लागू नाही.

५. सर्व जिल्हा पुनर्वसन अधिकारी, उपविभागीय अधिकारी तसेच संबंधित महसूल अधिकारी यांनी प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेऊन, परिपत्रक दिनांक २.६.२०२५ अन्वये पात्र असलेल्या सर्व वारसांना स्वतंत्र घटक/एक युनिट म्हणून प्रकल्पग्रस्त दर्जा देण्याबाबत आवश्यक पुनर्निरिक्षण करावे व सुधारित आदेश तात्काळ निर्गमित करावेत.

६. भविष्यात उद्भवणाऱ्या सर्व प्रकरणात शासन परिपत्रक दिनांक २.६.२०२५ अन्वये दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोर पालन करावे. पूर्वीच्या पत्रातील कोणतीही तरतूद विसंगत असल्यास, ती दुर्लक्षित करावी.

७. शासन पत्र दिनांक ४.३.२०२५ मध्ये टंकलेखनातील चुकांमुळे निर्माण झालेल्या संभ्रमाला दूर करण्यासाठी, उक्त व्याख्येत नमूद केलेले शब्द व कंस हे मूळ अधिनियमात असलेल्या शब्दांकनानुसारच ग्राह्य धरावेत. केवळ टंकलेखनातील चुकीचा आधार घेऊन पात्र वारसांना लाभ नाकारल्यास, सदर कार्यवाही विसंगत ठरेल.

८. सर्व जिल्हाधिकारी यांनी सदर सूचनांची अंमलबजावणी काटेकोरपणे होत असल्याबाबत शासनास अहवाल सादर करावा. विभागीय आयुक्तांनी या मुद्याबाबत आढावा घेऊन निर्देशांचे पालन होत असल्याची दक्षता घ्यावी.

सदर शासन परीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन संकेताक २०२६०४०७१२०८१३९९१९ असा आहे. सदरचे परीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्रचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by RAJESH HEMCHAND BAGDE
Date: 2026.04.07 12:09:35 +05'30'

**( राजेश बागडे )**
**उप सचिव, महसूल व वन विभाग**

**प्रत:-**

१. मा. मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
२. मा. राज्यमंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
३. मा. अ.मु.स (मदत व पुनर्वसन) यांचे स्वीय सहायक मंत्रालय, मुंबई
४. सर्व विभागीय आयुक्त
५. सर्व जिल्हाधिकारी
६. सह सचिव (पुनर्वसन) महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
७. निवडनस्ती कार्यासन र-१, महसुल व विभाग, मंत्रालय, मुंबई ३२